# ई – निविदा सूचना
# ग्रामपंचायत चारगाव
# पंचायत समिती पारशिवनी, जि. प. नागपुर
# सन २०२६ – २०२७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| याद्वारे सर्व पुरवठा धारकास सूचित करण्यात येत आहे कि, ग्रामपंचायत चारगाव. पारशिवनी, जिल्हा नागपुर ला खालील कामा करिता बांधकाम साहित्य आवश्यकते नुसार पुरवठा करिता ई – निविदा महाराष्ट्र शासनाच्या mahatender.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. | | | | |
| **अ.क्र.** | **तपशील** | **दर विक्रीचा व स्वीकृत दिनांक** | **निविदा उघडण्याचा दिनांक** | **निविदा फोर्म किंमत** |
| १ | ग्रामपंचायत चारगाव अंतर्गत चारगाव सर्व योजना अंतर्गत २०२६ – २७ वर्षाकरिता सर्व प्रकारच्या साहित्याचा पुरवठा करणे बाबत. | १९/०५/२०२६ ला सकाळी १०.०० ते २५/०५/२०२६ ला सायं. ०६.०० पर्यंत | निविदा शक्यतो दिनांक २६/०५/२०२६ ला सकाळी १०.०० वा. उघडण्यात येईल. | ५००/- Mahatender SBI Pay |

निविदेतील अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या mahatender.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**सरपंच**
**ग्रामपंचायत चारगाव**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत चारगाव**

# बांधकाम साहित्य खरेदी करिता ई – निविदा सूचना सन २०२५ – २६

**याद्वारे सर्व अधिकृत बांधकाम साहित्य पुरवठादारास सूचित करण्यात येते कि, ग्रामपंचायत चारगावला वरील कामा करिता आवश्यकते नुसार बांधकाम साहित्य पुरवठा करण्याबाबत ई – निविदा मागवण्यात येत आहे. तरी इच्छुक पुरवठादरांनी आपले दर सोबतच्या दर पत्रकामध्ये दिनांक २५/०५/२०२६ सायं. ०६.०० पर्यंत mahatender.gov.in ह्या संकेत स्थळावर सादर कराव्या.**

**अटी व शर्ती** :-

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई – निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिद्धी सूचना शुद्धी प्रत्रके इत्यादीची माहिती mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

२) सदर कामाच्या निविदा बाबत खालील बाबी आवश्यक राहतील.

- PAN कार्ड
- GST प्रमाणपत्र
- GST निपटारा मार्च २०२६
- आयकर विवरण पत्र (सन २०२३ – २४,२०२४ – २५, २०२५ - २६)
- पुरवठा धारकाचे दुकान असल्याचे ( ग्रामपंचायत / नगरपरिषद / महानगरपालिका) प्रमाणपत्र
- ग्रामपंचायत, नगरपरिषद महानगर पालिका व कोणत्याही शासकीय संस्थेत मागील तीन वर्षात समाधानकारक साहित्य पुरवठा केल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र

३) निविदा उघडण्याची कार्यवाही शासन निर्णय क्र. निविदा – २०१२/प्र.क्र. ९७/पंरा – ७/ दि. २३ सप्टे. २०१४ नुसार करण्यात येईल.

४) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८ प्र.क्र. १४४/२०१८ कोषा प्रशा – ५ दिनांक २८/०९/२०१८ नुसार देयकावर २% TDS कपात करण्यात येईल.

५) निविदा बाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना शुद्धिपत्रक अथवा इतर माहिती mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६) साहित्य ग्रामपंचायत ने दिलेल्या ठिकाणी व विहित मुदतीत पुरवठा करणे अनिवार्य राहील व पुरवठा न केल्यास संबंधित निविदा रद्द करून काळ्या यादीत नाव समाविष्ठ करण्यात येईल.

७) सदर कामाचा ०३ निविदा प्राप्त झाल्याशिवाय उघडण्यात येणार नाही.

८) पुरवठा धारकातर्फे कोणत्याही शर्ती व अटी घालून सादर केलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

९) बाजार भावा पेक्षा कमी दर सादर केल्यास सादर केलेल्या भावातच साहित्य पुरवठा करावा लागेल. सादर केलेल्या दरात साहित्य पुरवठा न केल्यास संबंधित पुरवठा धारकास ग्रामपंचायत च्या काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

१०) निविदा मंजूर झाल्यास सात दिवसाच्या आत रु १०० /- Stamp पेपरवर ग्रामपंचायत सोबत करारनामा करून द्यावा लागेल. अन्यथा आपली निविदा रद्द समजण्यात येईल यावर आपला कोणताही आक्षेप अथवा उजर राहणार नाही.

११) अनामत रक्कम १००० /- रुपये निविदा मंजूर झाल्यानंतर ग्रा.पं. ला जमा करावे लागेल.

१२) साहित्याचे दर हे कारसह (GST) व पोहचवते राहील.

१३) शासन निर्णय नुसार आयकर, विक्रीकर व इतर कर कपात करण्यात येईल.

१४) बाजार भावापेक्षा अत्यंत कमी अथवा जास्त दाराच्या निविदा स्विकारल्या जाणार नाही.

१५) सदर कामे पूर्ण झाल्यानंतर कामाचे मुल्यांकन करून पंचायत समिती, व जिल्हा परिषद नागपूर कार्यालयाकडून देयक मंजूर व रक्कम प्राप्त झाल्यानंतर पुरवठा धारकांना साहित्याचे देयक अदा करण्यात येईल.

१६) बांधकाम साहित्याच्या रॉयल्टी ची रक्कम पुरवठा धारकाने स्वतः भरावे लागेल. रॉयल्टी भरल्याची पावती बिला सोबत सादर करावी रॉयल्टी ची पावती ग्रामपंचायत च्या नावाने असावी अन्यथा रॉयल्टी ची रक्कम बिलामधून कपात करण्यात येईल.

१७) साहित्य पुरवठा धारकाने नामांकित कंपनीचे व चांगल्या प्रतीचे व प्रमाणबध्द साहित्य पुरवठा करने आवश्यक राहील.

१८) कोणत्याही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत ला राहील. यावर आपला आक्षेप अथवा उजर राहणार नाही.

१९) टेंडर फी ची पावती पोर्टल वर टेंडर फी च्या लिफाफा मध्ये उपलोड करावी. अपलोड न केल्यास सदर पुरवठा धारकाची निविदा रद्द करण्यात येईल.

२०) नवीन नियम १५ ऑगस्ट २०२४ नुसार टेंडर फी हे ऑनलाईन स्वरुपात mahatender.gov.in यावर SBI PAY अंतर्गत ऑनलाईन स्वरुपात स्वीकारल्या जाईल.

२१) तांत्रिक दस्ताऐवजमध्ये तफावत असल्यास पुरवठा धारकास कारण नमूद करून रद्द करण्यात येईल, पुरवठा धारकाने दस्ताऐवज अटी व शर्ती प्रमाणेच तांत्रिक दस्ताऐवज अपलोड करावे. असे न केल्यास पुरवठाधारकास सहभाग घेता येणार नाही त्यामुळे सर्वस्वी जबाबदारी पुरवठा धारकाची राहील.

**सरपंच**
**ग्रामपंचायत चारगाव**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत चारगाव**

Signature Not Verified

Digitally signed by VISHNU NAMDEV SAHARE
Date: 2026.05.19 15:08:16 IST
Location: Maharashtra-MH